लोकमत

संडे अँकर । देवानंद शिंदे । सांगली, कुरुंदवाडच्या चार महाविद्यालयांची, पूरपरिस्थितीची पाहणी केली

# विद्यापीठात आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारणार

## गहिवरले...

महाविद्यालयांच्या भिंतींवर महापुराच्या दहा-बारा फूट उंचीच्या तांबड्या-करड्या ओलेत्या खुणा... फरशांवर, जमिनीवर मातकट चिखलाचा थर... वर्गखोल्यांतील भिजून मोडलेले बेंच... कार्यालयीन साहित्याचे झालेले प्रचंड नुकसान... प्रयोगशाळांतील साहित्याची झालेली प्रचंड नासधूस... ग्रंथालयांतील कपाटांमध्ये अक्षरश: कुजलेली दुर्मीळ पुस्तकं... परिसरात सर्वत्र भरुन राहिलेला कुजट, कुबट वास... अशी काळजाला पिळवटून टाकणारी दृश्ये पाहून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांना गहिवरुन आले.

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठात कायमस्वरुपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा आपला मनोदय असून, साहित्य, साहाय्य आणि प्रशिक्षण अशा तिहेरी स्वरुपाची भूमिका या केंद्राच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ बजावेल, अशी माहिती कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी दिली.

महापूरग्रस्त झालेल्या सांगली आणि कुरुंदवाड येथील महाविद्यालयांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी भेट देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली. यावेळी ते बोलत होते. यावेळी कुलगुरु शिंदे म्हणाले, कोल्हापूर, सांगली परिसरांत आलेल्या अभूतपूर्व महापुरामुळे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सुमारे दहा महाविद्यालयांचे कमी-अधिक प्रमाणात नुकसान झाले आहे. गेल्या दोन दिवसांपासून त्या महाविद्यालयांना मी भेटी देऊन पाहणी करीत आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठाच्या स्तरावरुन नेमकी कशा स्वरुपाची मदत करता येईल, याविषयी सविस्तर चर्चा करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी या संदर्भातील विषय व्यवस्थापन परिषदेसमोर मांडण्यात येईल.

सांगली येथील भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, मथुबाई गरवारे महाविद्यालय आणि कुरुंदवाड येथील स. का. पाटील महाविद्यालय या चार महाविद्यालयांना त्यांनी भेटी दिल्या.

यावेळी प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य अॅड. धैर्यशील पाटील, डॉ. डी. जी. कणसे, डॉ. सी. टी. कारंडे, अधिसभा सदस्य संजय परमणे, विशाल गायकवाड, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. संजय ठिगळे, प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील, डॉ. बी. व्ही. ताम्हणकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, एन.एस.एस. व एन.सी.सी.चे समन्वयक उपस्थित होते.

## सांगली शहर, जिल्ह्यातही स्वच्छता मोहीम

सांगली शहरासह जिल्ह्यातही राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांच्या माध्यमातून नियोजनबद्धरीत्या स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, असे आवाहन कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगली जिल्ह्यातील समन्वयकांना केले. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात कुलगुरुंच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील एनएसएस, एनसीसी समन्वयकांची बैठक आयोजित करण्यात आली. स्वच्छता मोहीम राबविताना स्वयंसेवकांना मास्क, हातमोजे, गमबूट, आदी आवश्यक साहित्य उपलब्ध करवून देण्यात यावे. तसेच, त्यांच्या आरोग्याची पूर्ण खबरदारी घेऊनच स्वच्छता मोहीम राबवावी, असे आवाहनही त्यांनी केले. ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, डिग्री प्रमाणपत्रे, आदींचे पुरामुळे नुकसान झाले असेल, त्यांनी योग्य पुरावे प्रदर्शित केल्यास त्यांना सदर कागदपत्रे विद्यापीठाकडून मोफत उपलब्ध करुन देण्याचा मानस असल्याचेही कुलगुरु डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# विद्यापीठात कायमस्वरुपी आपत्ती निवारण केंद्र

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

'शिवाजी विद्यापीठात कायमस्वरुपी आपत्ती निवारण केंद्र उभारण्यात येईल' अशी घोषणा कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी शनिवारी केली. महापुरामुळे विविध कॉलेजांची झालेली दुरवस्था, वर्गखोल्यांतील चिखलाचा थर, ग्रंथालयाचे नुकसान, खराब फर्निचर पाहून कुलगुरुंना गहिवरुन आले.

कुलगुरू शिंदे, प्रकुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, प्राचार्य धनाजी कणसे, डॉ. सी. टी. कारंडे यांच्यासह शनिवारी कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यातील पूरबाधित कॉलेजांची पाहणी केली. सांगली येथील भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम कॉलेज, कस्तुरबाई वालचंद कॉलेज, मथुबाई गरवारे कॉलेज आणि कुरुंदवाड येथील स. का. पाटील कॉलेजला भेट दिली. डॉ. शिंदे हे गेल्या दोन दिवसापासून विविध कॉलेजांची पाहणी करत आहेत.

कुलगुरू शिंदे म्हणाले, 'महापुरामुळे बाधित झालेल्या कॉलेजांना विद्यापीठाकडून कशा स्वरुपाची मदत करता येईल यासंदर्भात व्यवस्थापन परिषदेत चर्चा करुन निर्णय होईल. महापुरामुळे दोन्ही जिल्ह्यांतील दहा कॉलेजांचे नुकसान झाले आहे. या कॉलेजांना मदतीचा हात दिला जाईल. दरम्यान, विद्यापीठात कायमस्वरुपी आपत्ती निवारण केंद्र उभारण्याचा मनोदय आहे. या केंद्राच्या माध्यमातून प्रशिक्षण, सहाय्य आणि साहित्याची उपलब्धता अशी भूमिका विद्यापीठ पार पाडेल.'

याप्रसंगी सिनेट सदस्य संजय परमणे, विशाल गायकवाड, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. संजय ठिगळे, प्राचार्य आर. एस. पाटील, डॉ. बी. व्ही. ताम्हणकर आदी उपस्थित होते.

# गुणपत्रिका, प्रमाणपत्रे विद्यापीठ मोफत देणार

## कुलगुरू डॉ. शिंदे; पूरग्रस्त विद्यार्थ्यांना आवाहन

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका व पदवी प्रमाणपत्रांचे पुरामुळे नुकसान झाले असेल, त्यांनी योग्य पुरावे दिल्यास त्यांना ती कागदपत्रे शिवाजी विद्यापीठाकडून मोफत देण्याचा मानस असल्याचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी सांगितले. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात कुलगुरूंच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील एनएसएस, एनसीसी समन्वयकांच्या बैठकीत ते बोलत होते.

महापुराने मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झालेल्या सांगली शहरासह जिल्ह्यातही राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांच्या माध्यमातून नियोजनबद्धरित्या स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, असे आवाहनही त्यांनी सांगली जिल्ह्यातील समन्वयकांना केले. स्वच्छता मोहीम राबविताना स्वयंसेवकांना मास्क, हातमोजे,



गमबूट आदी आवश्यक साहित्य देण्यात यावे. तसेच, त्यांच्या आरोग्याची पूर्ण खबरदारी घेऊनच स्वच्छता मोहीम राबवावी, असेही सांगितले.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. डी. जी. कणसे, डॉ. सी. टी. कारंडे, अधिसभा सदस्य संजय परमणे, विशाल गायकवाड, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. संजय ठिगळे, प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील, डॉ. बी. व्ही. ताम्हणकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, एनएसएस व एनसीसी समन्वयक उपस्थित होते.

# सांगली, कुरुंदवाडमधील महाविद्यालयांची कुलगुरूंकडून पाहणी

## पूरबाधित महाविद्यालयांचे मोठे नुकसान; कुलगुरू डॉ. शिंदे गहिवरले





**कोल्हापूर : १) सांगलीच्या मथुबाई गरवारे महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दालनाची झालेली दुरवस्था पाहताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. २) कुरुंदवाड येथील एस. के. पाटील महाविद्यालयातील कार्यालयाची झालेली दुरवस्था. (छाया : तय्यब अली)**

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

महाविद्यालयांच्या भिंतींवर महापुराच्या दहा-बारा फूट उंचीच्या तांबड्या-करड्या ओल्या खुणा... फरशांवर जमिनीवर मातकट चिखलाचा थर... वर्गखोल्यांतील भिजून मोडलेले बेंच... कार्यालयीन साहित्याचे झालेले नुकसान... प्रयोगशाळांतील साहित्याची झालेली प्रचंड नासधूस... ग्रंथालयांतील कपाटांमध्ये कुजलेली दुर्मीळ पुस्तकं... परिसरात सर्वत्र भरून राहिलेला कुजट, कुबट वास... अशी सांगली, कुरुंदवाडमधील चार महाविद्यालयांतील दृश्य पाहून कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना गहिवरून आले.

महापुराने ग्रस्त सांगली व कुरुंदवाड येथील महाविद्यालयांना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी भेट देऊन परिस्थितीची पाहणी केली. सांगली येथील भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, मथुबाई गरवारे महाविद्यालय आणि कुरुंदवाड येथील स. का. पाटील महाविद्यालयांचा समावेश आहे. सांगलीतील बसस्थानक परिसरातील मथुबाई गरवारे महाविद्यालयाचे पुराच्या पाण्यामुळे प्रचंड नुकसान झाले आहे. प्रांगण खराब झालेल्या साहित्याने भरून गेले असून अद्यापही ते बाहेर काढण्याचे काम सुरूच आहे. कुलगुरूंनी प्राचार्य डॉ. आर.जी. कुलकर्णी यांचे सांत्वन करीत दिलासा दिला.

कुरुंदवाडच्या एस. के. पाटील महाविद्यालयाचा तळमजला आठवडाभर पाण्याखाली होता. कार्यालय, वर्गखोल्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पाणी चढत असल्याचे लक्षात आल्यानंतर महाविद्यालयातील कर्मचाऱ्यांनी शक्य तितके कार्यालयीन दप्तर, कागदपत्रे, ग्रंथ आदी साहित्य उंचावर ठेवण्याचा प्रयत्न केल्याचे भेटीप्रसंगी लक्षात येत होते. तळमजला पाण्यात गेला असतानाही वरच्या दोन मजल्यांवर सुमारे हजारभर पूरग्रस्तांसाठी निवारा कॅम्प महाविद्यालयाने या काळात चालविला. याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांनी प्राचार्य डॉ. टी. के. जाधव यांचे अभिनंदन केले. अद्यापही अनेक बाधित नागरिक येथील कॅम्पमध्ये आहेत. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगलीवाडी येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाला भेट दिली. आयर्विन पुलापासून नजीक असलेल्या महाविद्यालयाच्या तळमजल्यावर पुराचे पाणी घुसले होते. प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे व त्यांच्या सहकाऱ्यांनी परिसरातल्या सुमारे तीन हजार पूरग्रस्तांची वरच्या मजल्यावर सोय केली. पुराचे पाणी ओसरेपर्यंत परिसरातल्या नागरिकांची महाविद्यालयाने केलेल्या व्यवस्थेबद्दल कुलगुरूंनी कौतुक केले. शहरातल्या कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील संगणक कक्ष, रसायनशास्त्र प्रयोगशाळा आणि त्याशेजारच्या वर्गखोल्यांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले. प्राचार्य डॉ. व्ही. बी. कोडग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसंगावधान राखून शक्य तितके संगणक वरच्या मजल्यांवर हलविल्याने नुकसानीची तीव्रता कमी झाली. मात्र, अद्यापही या साऱ्या खोल्यांमध्ये ओलसरपणा आणि कुबट वास भरून राहिला आहे. या महाविद्यालयाच्या वरच्या मजल्यांवरही हजारहून अधिक पूरग्रस्त नागरिकांसाठी निवारा कॅम्प चालविण्यात आला होता.

पुढारी




कोल्हापूर : सांगलीच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'एनएसएस' व 'एससीसी' कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बैठकीस बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे. डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. डी. जी. कणसे, ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. सी. टी. कारंडे, विशाल गायकवाड, संजय परमाणे आदी.

# विद्यापीठात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारणार : कुलगुरू

(पान १ वरून) निर्णय घेण्यात येईल. यासंदर्भातील विषय व्यवस्थापन परिषदेसमोर मांडण्यात येईल, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

**सांगली शहर-जिल्ह्यातही स्वच्छता मोहीम**

महापुराने मोठ्या प्रमाणात नुकसान झालेल्या सांगली शहरासह जिल्ह्यातही राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) व राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) यांच्या माध्यमातून नियोजनबद्धरीत्या स्वच्छता मोहीम राबविण्यात यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगली जिल्ह्यातील समन्वयकांना केले.

यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. डी. जी. कणसे, डॉ. सी. टी. कारंडे, अधिसभा सदस्य संजय परमाणे, विशाल गायकवाड, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. संजय ठिगळे, प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील, डॉ. बी. व्ही. ताम्हणकर आदी उपस्थित होते.

# चिखलाचा थर... भिजलेले बेंच...

## पूरग्रस्त भागांत कुलगुरूंचा दौरा; सांगली, शिरोळमधील महाविद्यालयांना भेटी

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : महाविद्यालयांच्या भिंतींवर महापुराच्या दहा-बारा फूट उंचीच्या तांबड्या-करड्या झालेल्या खुणा... फरशांवर जमिनीवर मातकट चिखलाचा थर... वर्गखोल्यांतील भिजून मोडलेले बेंच... कार्यालयीन साहित्याचे झालेले प्रचंड नुकसान... प्रयोगशाळांतील साहित्याची झालेली प्रचंड नासधूस... ग्रंथालयांतील कपाटांमध्ये अक्षरशः कुजलेली दुर्मिळ पुस्तकं... परिसरात सर्वत्र भरून राहिलेला कुजट, कुबट वास... अशी काळजाला पिळवटून टाकणारी दृश्यं शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना दिसून आली.

कुलगुरू डॉ. शिंदे व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी महापुराने ग्रस्त झालेल्या सांगली आणि कुरुंदवाड येथील महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली. डॉ. शिंदे यांनी सांगली येथील भारती विद्यापीठाचे डॉ. पतंगराव कदम महाविद्यालय, कस्तुरबाई वालचंद महाविद्यालय, मथुबाई गरवारे महाविद्यालय आणि कुरुंदवाड येथील स. का. पाटील महाविद्यालयाला भेटी दिल्या.



**कोल्हापूर : सांगलीच्या श्रीमती मथुबाई गरवारे महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दालनाची झालेली दुरवस्था पाहताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

मथुबाई गरवारे महाविद्यालयात लाकडी टेबल-खुर्च्या आदी सामानासह काचसामान, संगणक या पायाभूत सुविधांची मोठी नासधूस झाली आहे. वर्गातले बेंच आणि लाकडी सामान पाण्याने कुजून खराब झाले आहे. तळमजल्यावरील ग्रंथालयातील दुर्मिळ ग्रंथसंपदेची दुरवस्था झाली आहे.

कुरुंदवाडच्या एस. के. पाटील महाविद्यालयाचा संपूर्ण तळमजला आठवडाभर पाण्याखाली होता. इथेही कार्यालय, वर्गखोल्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पाणी ओसरल्यानंतर कालच सकाळी महाविद्यालयाचा तळमजला उघडून कर्मचाऱ्यांनी स्वच्छता मोहीम सुरू केली. तत्पूर्वी, कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगलीवाडी येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाला भेट दिली. कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील संगणक कक्ष, रसायनशास्त्र प्रयोगशाळा आणि त्याशेजारच्या वर्गखोल्यांमध्ये पाणी शिरून नुकसान झाले.

### कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र

शिवाजी विद्यापीठात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा मनोदय असून साहित्य, साहाय्य आणि प्रशिक्षण अशा तिहेरी स्वरूपाची भूमिका शिवाजी विद्यापीठ बजावेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. अभूतपूर्व महापुरामुळे विद्यापीठाशी संलग्नित सुमारे दहा महाविद्यालयांचे नुकसान झाले आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरून नेमकी कशा स्वरूपाची मदत करता येईल, याविषयी व्यवस्थापन परिषदेत चर्चा करू असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

# पूरबाधित चार कॉलेजची कुलगुरूंकडून पाहणी

## सांगली, कुरुंदवाडमधील स्थिती पाहून डॉ. देवानंद शिंदे गहिवरले

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

महाविद्यालयांच्या भिंतींवर महापुराच्या दहा-बारा फूट उंचीच्या तांबड्या-करड्या ओलेत्या खुणा... फरशांवर, जमिनीवर मातकट चिखलाचा थर... वर्गखोल्यांतील भिजून मोडलेले बेंच... कार्यालयीन साहित्याचे झालेले प्रचंड नुकसान... प्रयोगशाळांतील साहित्याची झालेली प्रचंड नासधूस... ग्रंथालयांतील कपाटांमध्ये अक्षरशः कुजलेली दुर्मीळ पुस्तके... परिसरात सर्वत्र भरून राहिलेला कुजट, कुबट वास... अशी काळजाला पिळवटून टाकणारी दृश्ये पाहून शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांना गहिवरून आले. त्यांनी शुक्रवारी सांगली आणि कुरुंदवाड येथील महाविद्यालयांना भेटी देऊन तेथील परिस्थितीची पाहणी केली.

सांगलीतील बसस्थानक परिसरातील मथुबाई गरवारे महाविद्यातील तळमजल्यावरील प्राचार्यांच्या दालनासह कार्यालय, वर्गखोल्या, उपाहारागृह, प्रयोगशाळा, ग्रंथालय आदी ठिकाणी पूर्णतः पाणी भरले होते. त्यामुळे लाकडी टेबल-खुर्च्या आदी सामानासह काचसामान, संगणक आदी पायाभूत सुविधांची मोठी नासधूस झाली आहे. वर्गातील बेंच आणि लाकडी सामान तर पाण्याने कुजून खराब झाले आहे. तळमजल्यावरील ग्रंथालयातील दुर्मीळ ग्रंथसंपदेची दुरवस्था झाली आहे.

कुरुंदवाडच्या एस. के. पाटील महाविद्यालयाचा संपूर्ण तळमजला आठवडाभर पाण्याखाली होता. इथेही कार्यालय, वर्गखोल्यांचे मोठे नुकसान झाले आहे. विशेष म्हणजे तळमजला पाण्यात गेल्याचे दुःख असतानाही वरच्या दोन मजल्यांवर सुमारे हजारभर पूरग्रस्तांसाठी निवारा कॅम्प महाविद्यालयाने या काळात चालवला, याबद्दल कुलगुरू डॉ. शिंदे यांनी प्राचार्य डॉ. टी. के. जाधव यांचे विशेष अभिनंदन केले. अद्यापही अनेक बाधित नागरिक येथील कॅम्पमध्ये आहेत.

तत्पूर्वी कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगलीवाडी येथील भारती विद्यापीठाच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाला भेट दिली. या महाविद्यालयाच्या तळमजल्यावर पुराचे पाणी घुसले होते. तरीही प्राचार्य डॉ. डी. जी. कणसे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी परिसरातल्या सुमारे तीन हजार पूरग्रस्तांची वरच्या मजल्यावर सोय केली.

शहरातल्या कस्तुरबाई वालचंद महाविद्यालयाच्या तळमजल्यावरील संगणक कक्ष, रसायनशास्त्र प्रयोगशाळा आणि शेजारच्या वर्गखोल्यांमध्ये पाणी शिरून मोठे नुकसान झाले. प्राचार्य डॉ. व्ही. बी. कोडग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी प्रसंगावधान राखून शक्य तितके संगणक वरच्या मजल्यावर हलवल्याने नुकसानीची तीव्रता कमी झाली. अद्याप या साऱ्या खोल्यांमध्ये ओलसरपणा आणि कुबट वास भरून आहे. या महाविद्यालयाच्या वरच्या मजल्यावरही हजारहून अधिक पूरग्रस्त नागरिकांसाठी निवारा कॅम्प चालवण्यात आला.

प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, व्यवस्थापन परिषद सदस्य ॲड. धैर्यशील पाटील, डॉ. डी. जी. कणसे, डॉ. सी. टी. कारंडे, अधिसभा सदस्य संजय परमणे, विशाल गायकवाड, विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना समन्वयक डॉ. डी. के. गायकवाड, डॉ. संजय ठिगळे, प्राचार्य डॉ. आर. एस. पाटील, डॉ. बी. व्ही. ताम्हणकर यांच्यासह विविध महाविद्यालयांचे प्राचार्य, एनएसएस व एनसीसी समन्वयक उपस्थित होते.



**कोल्हापूर : सांगलीच्या मथुबाई गरवारे महाविद्यालयाच्या प्राचार्यांच्या दालनाची झालेली दुरवस्था पाहताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के.**

### कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र

शिवाजी विद्यापीठात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारण्याचा आपला मनोदय असून साहित्य, साहाय्य आणि प्रशिक्षण अशा तिहेरी स्वरूपाची भूमिका या केंद्राच्या माध्यमातून शिवाजी विद्यापीठ बजावेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली. पूरबाधित महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरून नेमकी कशा स्वरूपाची मदत करता येईल, याविषयी सविस्तर चर्चा करण्यासाठी आणि निर्णय घेण्यासाठी यासंदर्भातील विषय व्यवस्थापन परिषदेसमोर मांडण्यात येईल, असेही कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगितले.

### सांगली जिल्ह्यातही स्वच्छता मोहीम

महापुराने मोठ्या प्रमाणात नुकसानग्रस्त झालेल्या सांगली शहरासह जिल्ह्यातही राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) आणि राष्ट्रीय छात्रसेना (एनसीसी) यांच्या माध्यमातून नियोजनबद्धरीत्या स्वच्छता मोहीम राबवण्यात यावी, असे आवाहन कुलगुरू डॉ. शिंदे यांनी सांगली जिल्ह्यातील समन्वयकांना केले. डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात कुलगुरूंच्या भेटीच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील एनएसएस, एनसीसी समन्वयकांची बैठक आयोजित करण्यात आली, त्यावेळी ते बोलत होते.

# प्राचार्य असोसिएशनतर्फे स्वच्छता मोहीम

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठ प्राचार्य असोसिएशनतर्फे कमला कॉलेजमध्ये पूरग्रस्त शहरातील स्वच्छता मोहिमेसंदर्भात सहविचार सभा झाली. प्रभारी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, महापालिका आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी प्रमुख उपस्थित होते.



**कोल्हापूर : कमला कॉलेजमध्ये प्राचार्य संघटनेतर्फे आयोजित बैठकीत सहभागी आयुक्त डॉ. मल्लिनाथ कलशेट्टी, प्राचार्य डॉ. क्रांतिकुमार पाटील, प्राचार्य प्रवीण चौगले आदी.**

प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. क्रांतीकुमार पाटील म्हणाले, ''कोल्हापुरातील महापुराची समस्या गंभीर आहे. पाणी ओसरले आहे; पण स्वच्छतेचा प्रश्न निर्माण झाला आहे. सर्व महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेनेतील स्वयंसेवक स्वच्छतेच्या कामी सर्व शक्तीनिशी उतरतील. पूरग्रस्त बांधवांच्या मूलभूत गरजा पूर्णत्वासाठी सर्वतोपरी सहकार्य करतील.''

डॉ. कलशेट्टी म्हणाले, ''गेले सोळा रविवार स्वच्छता मोहीम सुरू आहे. आता शहरातील स्वच्छता सुरू आहे. या कामी महाविद्यालयीन युवकांचा उत्तम प्रतिसाद मिळत आहे. स्थलांतरित लोकांना मदत करावी लागणार आहे. जनजीवन पूर्वपदावर आणायचे आहे. रस्त्यावरचा कचरा लवकर उचलणे महत्त्वाचे आहे.''

डॉ. शिर्के म्हणाले, ''आम्ही १४ महाविद्यालयांचे पथक वेगवेगळ्या भागांमध्ये पाठवून स्वच्छतेच्या कामासंदर्भात आराखडा केलेला आहे. ही मोहीम राबविली जाणार आहे. पूरग्रस्त बांधवांना जी मदत हवी, ती करण्यासाठी विद्यापीठ तयार आहे.''

प्राचार्य डॉ. सुरेश गवळी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. डी. के. गायकवाड यांनी आभार मानले. महाविद्यालयांचे प्राचार्य, एनएसएसचे प्रकल्प अधिकारी, एनसीसी विभागाचे प्रतिनिधी उपस्थित होते.

पुढारी

# विद्यापीठात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारणार : कुलगुरू

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठात कायमस्वरूपी आपत्ती व्यवस्थापन केंद्र उभारणार असून साहित्य, साहाय्य व प्रशिक्षण अशा तिहेरी स्वरूपाची भूमिका केंद्राच्या माध्यमातून विद्यापीठ बजावेल, अशी माहिती कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

सांगलीच्या डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयात 'एनएसएस' व



'एससीसी' कार्यक्रम अधिकाऱ्यांच्या बैठकीत ते बोलत होते. कोल्हापूर, सांगली परिसरातील महापुरामुळे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या दहा महाविद्यालयांचे नुकसान झाले आहे. त्या महाविद्यालयांना प्रत्यक्ष भेटी देऊन पाहणी करीत आहे. या महाविद्यालयांना विद्यापीठ स्तरावरुन कशा स्वरुपाची मदत करता येईल, याविषयी चर्चा करून **पान २ वर**

## पुरात पदवी प्रमाणपत्रे खराब झाल्यास नवीन देणार

ज्या विद्यार्थ्यांच्या गुणपत्रिका, पदवी प्रमाणपत्रे आदींचे पुरामुळे नुकसान झाले असेल, त्यांनी योग्य पुरावे प्रदर्शित केल्यास त्यांना ही कागदपत्रे विद्यापीठाकडून मोफत उपलब्ध करून देण्याचा मानस असल्याचेही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी यावेळी सांगितले.